**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी**
**बांधकाम विभाग**

__प्रस्तावना__:-

**विषय :- प्रभाग समिती क्रं.2 च्या कार्यक्षेत्रातील मुख्य रस्त्यांची मास्टीक पध्दतीने दुरुस्ती करणे.**

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात ठिकठिकाणी रस्ते नादुरुस्त झाले असुन त्यामुळे वाहतुकीची कोंडी होत असलेबाबत संदर्भान्वये वाहतुक विभागाचे पत्र प्राप्त झाले आहे.सध्या मोठया प्रमाणात पडत असलेल्या संततधर पावसामुळे प्रभाग समिती क्र.2 च्या कार्यक्षेत्रातील मुख्य डांबरीरस्ते नादुरुस्त झालेले आहेत.लवकरच गणेशोत्सव सण येत आहे. गणेशोत्सव सणांमध्ये गणपती विसर्जन मार्गावर मोठया प्रमाणात मिरवणुक जात असतात. रस्त्यावरील खडयामुळे गणेश मुर्तींना अपघात होऊन नागरीकांच्या धार्मिक भावना दुखावण्याची शक्यता नाकारता येत नाही.त्यामुळे सदरचे रस्ते गणेशोत्सव सणपुर्वी नागरिकांच्या सोईकरिता दुरुस्तर करुन रहदारी करिता सुस्थितीत करणे आवश्यक आहे. याकामी स्थानिक नागरीक व पदाधिकारी वारंवार मागणी करित आहेत.मागील वर्षी मास्टीक पध्दतीने रस्ते दुरुस्ती करण्यात आलेली होती व रस्ते आजच्या स्थितीत देखील सुस्थितीत आहे.मा.जिल्हाधिकारी ठाणे यांचेकडे दि.06/07/2024 रोजी झालेल्या रस्ते सुरक्षा बैठक-2024 मध्येमा.जिल्हाधिकारी ठाणे यांनी देखील नादुरुस्त रस्त्यांची दुरुस्ती मास्टिक पध्दतीने करण्याबाबतचे निर्देश दिलेले आहेत.पावसाळयात डांबरीकरणाने रस्ते दुरुस्त केल्यास पावसाच्या पाण्यामुळे रस्ते पुन्हा खराब होण्याची शक्यता नाकरता येत नाही त्यामुळे मास्टीक पध्दतीने रस्ते दुरुस्ती करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने विषयांकीत कामास रक्कम रुपये ३४,९७,०६८/- (अक्षरी चौतीस लाख सत्याणव हजार अडुसष्ट मात्र ) इतका खर्चाचा प्रस्ताव सादर केला असता त्यास मा.आयुक्त सो यांनी दि.१९/०७/२०२४ रोजी मंजुरी दिली आहे. तरी सदरचा प्रस्ताव प्रशासकीय मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे.

ठराव क्र.:- ४८३ दिनांक :-२४/०८/२०२४

प्रभाग समिती क्रं.2 च्या कार्यक्षेत्रातील मुख्य रस्त्यांची मास्टीक पध्दतीने दुरुस्ती करणे कामाचा रक्कम रुपये ३४,९७,०६८/- (अक्षरी चौतीस लाख सत्याणव हजार अडुसष्ट मात्र ) इतका खर्चाचा प्रस्ताव सादर केला असुन शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त् अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग,मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२)नवि-१४,दिनांक ०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ (१अ) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य,प्रशासक तथा आयुक्त,भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, प्रभाग समिती क्रं.2 च्या कार्यक्षेत्रातील मुख्य रस्त्यांची मास्टीक पध्दतीने दुरुस्ती करणेस प्रशासकीय मंजुरी देत आहे.

(अजय वैद्य)
प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी नि.श.महानगरपालिका